**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - १७**

**ड प्रभाग समिती,**

**कार्यपत्रिका क्र. ९**

**सभावृत्तांत**

दिनांक ०५/१२/२०१४ वेळ दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे डिसेंबर २०१४ ची मासिक सभा शुक्रवार दि. ०५/१२/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता ड क्षेत्रिय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा.श्रीमती आरती सुरेश चोंधे | अध्यक्ष |
| २. मा.श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्य |
| ३.मा.श्रीमती उषा संजोग वाघेरे (पाटील) | सदस्य |
| ४. मा.श्रीमती आसवाणी सविता धनराज | सदस्य |
| ५. मा.श्रीम. विमल रमेश काळे | सदस्य |
| ६. मा. श्रीम. जवळकर वैशाली राहुल | सदस्य |
| ७. मा. श्रीमती. निता विलास पाडाळे | सदस्य |
| ८.मा. श्री. विलास नांदगुडे | सदस्य |
| ९.मा. श्री. प्रमोद ताम्हणकर | सदस्य |
| १०. मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ११.मा.श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| १२. मा.श्री. जगताप राजेंद्र गणपत | सदस्य |

याशिवाय मा. चंद्रकांत खोसे, प्रभाग अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव,सभा शाखा, मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा, मा. ओहोळ, मा. दिलीप सोनवणे, मा. रत्नपारखी, उपअभियंता स्थापत्य,मा. जावळे, उपअभियंता पाणीपुरवठा, मा.रविंद्र पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा. कोंडे, कनिष्ठ अभियंता स्थापत्य, मा. मुलाणी, कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. पाडवी, मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. अजय जाधव, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. गोसावी, उद्यान निरीक्षक, मा. गायकवाड, आरोग्य निरीक्षक, मा.भाट, आरोग्य निरीक्षक, पशू वैद्यकीय विभाग इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

प्रशासन अधिकारी तथा सचिव, ड प्रभाग समिती यांनी मागील सभा कार्यपत्रिका क्र. ८ चा सभावृत्तांत कायम करण्यात यावा अशी सूचना मांडली.

मा. अध्यक्ष : मागील सभा कार्यपत्रिका क्र. ८ चा सभावृत्तांत कायम करण्यात येत आहे.

तदनंतर प्रशासन अधिकारी तथा सचिव, यांनी कार्यपत्रिकेवरील विषयावर मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने बैठकीत सादर केले.

ठराव क्र.२० विषय क्र. १

दिनांक : ५/१२/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक : मा.हिरांनद उर्फ डब्बु आसवाणी अनुमोदक : मा.निता विलास पाडाळे

संदर्भ : मा. हिरांनद उर्फ डब्बु आसवाणी यांचा दिनांक १०/११/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४४ मधील शास्त्री पार्क लगतच्या रस्त्यास श्री. टी.व्ही. मुलचंदानी व बी.टी. अडवाणी समोरील रस्त्याला उबाडो पंचायत रस्ता असे नामकरणे करुन तेथे त्या नावांचे फलक लावणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

--------------

ठराव क्र.२१ विषय क्र. २

दिनांक : ५/१२/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक : मा.सविता धनराज आसवाणी अनुमोदक : मा. कैलासभाऊ थोपटे

संदर्भ : मा. सविता धनराज आसवाणी यांचा दिनांक १३/११/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४३ जिजामाता रुग्णालय परिसर बी ब्लॉक गल्ली क्र. १७ ते २४ मध्ये बरीच शौचालये असुन सदर ठिकाणी अनधिकृत व्यवसाय चालतात तसेच बरेचवेळा दुर्गंधी व इतर कामांमुळे तेथील नागरीकांना त्रास होत असलेने सदर भागातील सर्व जुनी शौचालये पाडून १ महिलांसाठी व १ पुरुषांसाठी सुलभ शौचालय धर्तीवर शौचालय बांधणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

--------------

तदनंतर मा. सदस्य यांचे मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने खाली नमूद केलेप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र. ३ प्रभाग क्र. ५४ विशालनगर पिंपळे निलख मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात आलेल्या पिंपळे निलख – बाणेर पुलाला जोडणा-या पिंपळे निलख कडील रस्त्यावरील पुलाच्या अलिकडे असणा-या स.नं. ६५ येथील चौकास कै. श्रीपती टकले चौक असे नामकरण करणे

विषय क्र. ४ प्रभाग क्र. ५४ विशालनगर पिंपळे निलख कस्पटे वस्ती येथील वैकुंठवासी ह.भ.प. सितारामबुवा लक्ष्मण कस्पटे स्मशानभुमि मधील दहन शेड या भागास कै. भानुदास पंढरीनाथ मानकर असे नामकरण करणे

विषय क्र. ५ पिंपरी वाघेरे गावठाण प्रभाग क्र. ४५ मधील पि.सी.एम.सी. कॉलनी, तुळजा भवानी मंदिराजवळील संडास ब्लॉक, शौचालय यांची स्थिती अत्यंत खराब असुन त्या संडास ब्लॉकचा व शौचालयाचा वापर तेथील नागरीक करत नसलेने सदर शौचालय व संडास ब्लॉक पाडण्याबाबत तसेच प्रभाग क्र. ४५ मधील छत्रपती शिवाजी चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर दवाखाना असुन त्यास लागुन महापालिकेचे वाचनालय आहे. सदर वाचनामध्ये काही लोक बसुन दारु पितात म्हणुन ते वाचनालय तेथुन काढून टाकणे

विषय क्र. ६ काळेवाडी प्रभाग क्र. ४७ श्रीराम कॉलनी येथील अर्जुन नढे चाळ व शांताराम नढे येथील पेव्हींग ब्लॉकचा रस्ता अत्यंत खराब झालेला असल्याने येथे आर.सी.सी. रस्ता करणेबाबत

विषय क्र. ७ प्रभाग क्र, ४७ काळेवाडी येथे मेनरोड लगत फुटपाथवरील आधीचे पेव्हींग ब्लॉक्स खराब स्वरुपाचे झालेले असल्याने तेथे रंगीत ब्लॉक्स बसविणेबाबत

विषय क्र. ८ तापकीरमळा चौकातील कॉलनीस मधुबन कॉलनी असे नामकरण करणे व एम.एम. शाळेजवळील चौकास छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नामकरणे करणे

तदनंतर वरील दाखल विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र.२२ विषय क्र. ३
दिनांक : ५/१२/२०१४ विभाग – स्थापत्य
सुचक :मा.विलास नांदगुडे अनुमोदक : मा. प्रमोद ताम्हणकर

संदर्भ : मा. आरती चोंधे यांचा दिनांक ०५/१२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५४ विशालनगर पिंपळे निलख मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात आलेल्या पिंपळे निलख – बाणेर पुलाला जोडणा-या पिंपळे निलख कडील रस्त्यावरील पुलाच्या अलिकडे असणा-या स.नं. ६५ येथील चौकास कै. श्रीपती टकले चौक असे नामकरण करणे च्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

--------------

ठराव क्र.२३ विषय क्र. ४
दिनांक : ५/१२/२०१४ विभाग – स्थापत्य
सुचक :मा.विलास नांदगुडे अनुमोदक : मा. प्रमोद ताम्हणकर

संदर्भ : मा. आरती चोंधे यांचा दिनांक ०५/१२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५४ विशालनगर पिंपळे निलख कस्पटे वस्ती येथील वैकुंठवासी ह.भ.प. सितारामबुवा लक्ष्मण कस्पटे स्मशानभुमि मधील दहन शेड या भागास कै. भानुदास पंढरीनाथ मानकर असे नामकरण करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

--------------

ठराव क्र.२४ विषय क्र. ५
दिनांक : ५/१२/२०१४ विभाग – स्थापत्य
सुचक :मा.उषा संजोग वाघेरे(पाटील) अनुमोदक : मा.नीता पाडाळे

संदर्भ : मा. उषा संजोग वाघेरे(पाटील) यांचा दिनांक ०५/१२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी वाघेरे गावठाण प्रभाग क्र. ४५ मधील पि.सी.एम.सी. कॉलनी, तुळजा भवानी मंदिराजवळील संडास ब्लॉक, शौचालय यांची स्थिती अत्यंत खराब असुन त्या संडास ब्लॉकचा व शौचालयाचा वापर तेथील नागरीक करत नसलेने सदर शौचालय व संडास ब्लॉक पाडण्यास तसेच प्रभाग क्र. ४५ मधील छत्रपती शिवाजी चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर दवाखाना असुन त्यास लागुन महापालिकेचे वाचनालय आहे. सदर वाचनामध्ये काही लोक बसुन दारु पितात म्हणुन ते वाचनालय तेथुन काढून टाकणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

--------------

ठराव क्र.२५ विषय क्र. ६
दिनांक : ५/१२/२०१४ विभाग – स्थापत्य
सुचक :मा.निता विलास पाडाळे अनुमोदक : मा.सविता आसवानी

संदर्भ : मा. निता विलास पाडाळे यांचा दिनांक ०५/१२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

काळेवाडी प्रभाग क्र. ४७ श्रीराम कॉलनी येथील अर्जुन नढे चाळ व शांताराम नढे येथील पेव्हींग ब्लॉकचा रस्ता अत्यंत खराब झालेला असल्याने येथे आर.सी.सी. रस्ता करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

--------------

ठराव क्र.२६ विषय क्र. ७
दिनांक : ५/१२/२०१४ विभाग – स्थापत्य
सुचक :मा.निता विलास पाडाळे अनुमोदक : मा.सविता आसवानी

संदर्भ : मा. निता विलास पाडाळे यांचा दिनांक ०५/१२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र, ४७ काळेवाडी येथे मेनरोड लगत फुटपाथवरील आधीचे पेव्हींग ब्लॉक्स खराब स्वरुपाचे झालेले असल्याने तेथे रंगीत ब्लॉक्स बसविणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

--------------

ठराव क्र.२७ विषय क्र. ८
दिनांक : ५/१२/२०१४ विभाग – स्थापत्य
सुचक :मा.निता विलास पाडाळे अनुमोदक : मा.सविता आसवानी

संदर्भ : मा. निता विलास पाडाळे यांचा दिनांक ०५/१२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

तापकीरमळा चौकातील कॉलनीस “मधुबन कॉलनी” असे नामकरण करणे व एम.एम. शाळेजवळील चौकास “छत्रपती शिवाजी महाराज चौक” असे नामकरणे करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

--------------

तदनंतर नवनियुक्त क्षेत्रिय अधिकारी ड क्षेत्रिय कार्यालय यांनी स्वत:ची ओळख सर्व उपस्थितांना करुन दिली.

त्यानंतर मा. ड प्रभाग समिती सदस्य यांनी विविध समस्यांबाबत खालीलप्रमाणे मत मांडले.

**मा.श्री. ताम्हणकर** – विजयनगर मध्ये मध्यरात्री १० ते १२ या वेळेत मीटरची चोरी होत आहे. तसेच सदर चोरीबाबत तक्रार नोंदविण्यास गेल्यास तक्रारीची नोंद करुन घेणेत येत नाही. नवीन मीटर बसविणेस रु. १७००/- ते १८००/- खर्च येतो. याबाबत प्रशासनाने मार्गदर्शन करावे.

**मा. श्री. तांबे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा** – कोणत्याही ग्राहकाचा पाणी मीटर क्रमांक त्या ग्राहकांचे बिलाशी जोडलेला असतो त्यामुळे दुसरीकडे जर सदर मीटर जोडला तरी त्याचा

काहीही उपयोग होत नाही तसेच सदर मीटरचे संरक्षणासाठी ग्राहकांनी बॉक्स बसविणे योग्य राहील.

**मा. कैलासभाऊ थोपटे** – मीटर ठेकेदारांकडून घेणे बंधनकारक नसावे. दुसरीकडून मीटर घेऊन तो बसविणेची परवानगी असावी.
यास मा.निता विलास पाडाळे तसेच मा. अनिता मच्छिंद्र तापकीर यांनी दुजोरा दिला.

**मा. श्री. तांबे कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा**– इतर प्रभागातील माहिती घेऊन माहिती देतो.

**मा. निता विलास पाडाळे** –सध्या आरोग्य विभागाचे ज्या गाडयांमधुन औषध फवारणी करण्यात येते त्या गाडयांमधील औषधाचे प्रमाण हातपंपाने फवारणी करणा-यांपेक्षा कमी असते.

**सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे** – ६०० लीटर पाण्यात १ लीटर औषध असे प्रमाण असुन त्यानुसार कार्यवाही सुरु असते.

**मा. निता विलास पाडाळे** – एका प्रभागासाठी एकच टँकर आहे. एका वॉर्डात २-३ दिवस गाडी फिरणे आवश्यक आहे.

**मा. अध्यक्षा-** सदर टँकर एका वॉर्डातील फवारणीचे काम पूर्ण केल्याशिवाय दुस-या वॉर्डात पाठवू नये. सदर बाबीस मा. ताम्हणकर व मा. कैलासभाऊ थोपटे यांनी दुजोरा दिला.

**सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे** –एका वॉर्डातील फवारणीचे काम पूर्ण झाल्यानंतर टँकर दुस-या वॉर्डात पाठविण्यात येईल.

**मा. वैशाली जवळकर** – फॉगिंगचे गाडीचे डिझेल संपते किंवा ऑईल संपलेले असते.
यास मा. निता विलास पाडाळे यांनी दुजोरा दिला.

**सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे** –एका ठिकाणी तीन तास फवारणी करणेची कार्यवाही होईल.

**मा. निता विलास पाडाळे** – पावसाळी गटर योजनेची निविदा काढण्यात आली परंतु चेंबर्स साफ झालेली नाही व ड्रेनेज लाईनही साफ केलेल्या नाहीत. या कामात नियोजन करुन कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु तसे झालेले नाही.

**मा. सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे** – एकूण ड्रेनेज चेंबर्स २६० असुन त्यापैकी ५४ चेंबर्स साफ करणेची राहिली आहेत.

**मा. निता विलास पाडाळे** – प्रभाग अधिकारी यांनी सहा. आरोग्याधिकारी यांना चेंबरच्या लाईन साफ करण्याबाबत सूचना द्याव्यात.

**मा. निता विलास पाडाळे** – फॉगिंगसाठी पाठविणेत येणा-या गाडयांचा उपयोग होत नाही त्यांना रुट ठरवुन देणेत यावा.

**मा. प्रमोद ताम्हणकर** – सेफ्टी टँक साफसफाईचे अर्ज कोणाकडे मिळतात व या कामाचे अर्ज कोणाकडे सादर करावयाचे असतात, याबाबत नक्की तक्रार कोणाकडे करणेची आहे

**मुख्य आरोग्य निरीक्षक श्री. जाधव** – सदर काम नागरी सुविधा केंद्रामार्फत होत आहे. नागरीकांनी अर्ज करुन पैसे भरल्यानंतर १५ दिवसात सेफ्टी टँक साफ करण्याची कार्यवाही करण्यात येते.

**मा. कैलासभाऊ थोपटे-** नागरी सुविधा केंद्रातील कर्मचारी काय काम करतात त्यांचेवर नियंत्रण कोणाचेही नसते. कर्मचारी उपस्थित नसतात. तेथील सॉफ्टवेअर अपडेट नसते.

**मा. सचिव तथा प्रशासन अधिकारी श्री. लोणकर** – चार प्रभागात असणारी नागरी सुविधा केंद्र बंद करण्यात आलेली असुन नागरीकांच्या सोयीसाठी शहराच्या कार्यक्षेत्रात नागरी सुविधा केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत. सध्या संपुर्ण पिंपरी चिंचवड परिसरात १६ नागरी सुविधा केंद्र कार्यान्वित आहेत.

**मा. प्रमोद ताम्हणकर** – नागरीकांच्या सोयीसाठी एक नागरी सुविधा केंद्र पूर्वीप्रमाणे ड क्षेत्रिय कार्यालयात असणे आवश्यक आहे.

**मा. वैशाली जवळकर** – हॉकर्स झोनचे कामाचे काय झाले. फिरते हातगाडीवाले यांचेवर कारवाई करण्यात येत असुन जोपर्यंत त्यांना जागा मिळत नाही तोपर्यंत त्यांनी व्यवसाय कसा करायचा आहे.

**मा. सचिव तथा प्रशासन अधिकारी** – दिनांक ११/१२/२०१४ रोजी शहर फेरीवाला धोरणाबाबत मुख्य कार्यालयात बैठक आहे. सदर बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही करणेत येईल.

**मा. राजेंद्र जगताप** – मागील बैठकीमध्ये ठरल्यानुसार प्रभाग समिती बैठकीचे सुरुवातीस मागील बैठकीतील मुद्दयांवर काय कार्यवाही झाली याचा आढावा घेणेत येणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाहीचा आढावा घेतल्यानंतरच पुढील बैठक घेणेत यावी.

**मा. कैलासभाऊ थोपटे** – पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता श्री. शेख यांचेकडे दोन प्रभागांचे कामकाज आहे. ड क्षेत्रिय कार्यालयासाठी एक स्वतंत्र उपअभियंत्यांची नेमणुक करण्यात यावी.

**मा. बापू उर्फ शत्रुघ्न काटे** – मागील महिन्यात मागणी केलेली पाईपलाईनची माहिती अद्यापपर्यंत दिलेली नाही. प्रभाग क्र. ५५ मध्ये सध्या करण्यात येणा-या पाणीपुरवठयाची माहिती त्वरीत द्यावी. रात्री उशिरा पाणीपुरवठा करण्यात येतो . कुणाल आयकॉन सोसायटीतील ८७४ फ्लॅटधारकांना अतिशय कमी पाणी देणेत येते तसेच सदर भागात गेल्या ८ वर्षापासुन पाण्याचा प्रश्न असुन सुध्दा कार्यवाही पुर्ण झालेली नाही. तसेच पिंपळे सौदागर येथे ८००० फ्लॅटस आहेत. तेथेही पाणीपुरवठा विस्कळीत आहे. एक वेळ पाणीपुरवठा देखील योग्यरित्या होत नाही.

**मा. अध्यक्षा** – एक वेळ होणारा पाणीपुरवठाही नियमित करण्यात येत नाही.

**मा. बापू उर्फ शत्रुघ्न काटे** – काटेवस्ती येथील पाईपलाईन चे कामाचे आदेश देऊन तीन महिन्याचा कालावधी संपलेला आहे तरी पाणी पुरवठा देणेत येत नाही.

**मा. कार्यकारी अभियंता श्री. तांबे –** पुढील आठ दिवसात बदल होतील. या कामी चिंचवड ग्रॅव्हिटी येथून पाण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. तसेच ड क्षेत्रिय कार्यालयाकडील पाणीपुरवठा विभागाचे कामासाठी स्वतंत्र उपअभियंता उपलब्ध करुन देणेबाबत वरिष्ठांशी चर्चा केलेली आहे.

**मा. राजेंद्र जगताप** – ज्या ठेकेदाराला कामाचे आदेश दिलेले आहेत ते जर काम करण्यास तयार नसतील तर त्यांना काळया यादीत टाकण्यात यावे.

**मा. कैलासभाऊ थोपटे** – सदर परिसरातील पाण्याची अडचण गेल्या ७-८ वर्षापासुन आहे. एक वेळ पाणीपुरवठा होत असुन तोही पुरेसा नाही.

**कार्यकारी अभियंता श्री. तांबे** – चिंचवड येथील पाणी एक वेळ केलेले आहे. त्यामुळे ड प्रभागातील पाण्याची अडचण संपेल. तसेच ड प्रभागातील पाण्याच्या समस्येबाबत निरीक्षण करुन त्वरीत कार्यवाही करण्यात येईल.

**मा. राजेंद्र जगताप** – पाण्याची वेळ वाढविणेत यावी. तसेच पुढील प्रभाग समिती बैठकीचे वेळी सर्वप्रथम मागील बैठकीत चर्चिलेल्या विषयांबाबत संबंधित विभागाकडून काय कार्यवाही झाली याबाबत आढावा घेणेत येऊन नंतर पुढील बैठक घेणेत यावी .

पशूवैद्यकीय अधिकारी बैठकीस उपस्थित राहिलेले नाहीत. तसेच पुढील बैठकीस नगररचना, भूमिजिंदगी, स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत, जलनि:सारण, आरोग्य इ. विभागाचे अधिकारी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**मा. प्रमोद ताम्हणकर** – विजयनगर येथे डुकरांचा प्रादुर्भाव प्रचंड आहे. याबाबत लवकरात लवकर पशु वैद्यकीय विभागाने कारवाई करावी.

**मा. कैलासभाऊ थोपटे** – प्रत्येक प्रभागासाठी पशू वैद्यकीय विभागाकडील स्वतंत्र गाडी आवश्यक आहे. त्यास मा. वैशाली जवळकर व मा. अनिता तापकीर यांनी दुजोरा दिला.

**तदनंतर** मा. अध्यक्षा यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन दिनांक ५/१२/२०१४ रोजीची प्रभाग समिती बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

सही/-

(आरती सुरेश चोंधे)

**सभापती**

ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,

रहाटणी ४११०१७

सही/-

**प्रशासन अधिकारी तथा**

**सचिव, सभाशाखा**

ड क्षेत्रिय कार्यालय,पिं.चिं.म.न.पा.,

रहाटणी, पुणे-१७

क्रमांक – ड/१३/कावि/ ०९ /२०१४

दिनांक – ०४ /०२/२०१४